नि.दि.दावा क्र.१४/२०१६

संत गजानन महाराज –वि.– अमर शर्मा

नि.क्र.२८६ लगत

**<u>प्रतिवादीचे सा.क्र. २ यांचा पुढील सरतपास प्रतिवादीचे वकील श्री. एन. सी. वाघ यांचेमार्फत शपथेवर सुरु–</u>**

०३. माझे पुराव्याचे शपथपत्र मी दाखल केलेले आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. ते नि.क्र.२८६ वर आहे.

०४. आता मला मंदिर मार्केटचा एक नकाशा दाखविण्यात आला. तो मी तयार केला आहे. त्यावर माझी सही आहे. त्यामधील सर्व लेआऊट प्लॅन माझ्या माहितीप्रमाणे बरोबर आहेत. त्याला **<u>नि.क्र.२८७</u>** देण्यात येत आहे.

**<u>सरतपास संपला.</u>**

**<u>उलटतपास वादीचे विधीज्ञ श्री. एम. जी. सारडा यांच्यामार्फत सुरु...</u>**

०५. हे म्हणणे खरे आहे की, मी काढलेला नकाशा स्केलप्रमाणे नाही. हे म्हणणे खरे आहे की, नकाशा काढण्या अगोदर नकाशा काढण्यासाठी मी मंदिर मार्केटला भेट देत आहे याबाबतची नोटीस मी वादी संस्थेला दिली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, नकाशामधील संपूर्ण माहिती प्रतिवादीने सांगितल्याप्रमाणे नमुद केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, मंदिरात सुरक्षिततेच्या कारणास्तव कोणाचीही तपासणी केल्याशिवाय त्यांना प्रवेश दिल्या जात नाही. हे म्हणणे खरे नाही की, स्थळावर असलेल्या परिस्थितीनुसार नकाशा नाही.

**<u>उलटतपास संपला.</u>**

**<u>फेरतपास नाही.</u>**

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्विकृत | माझे समक्ष |
| स्वा/– | स्वा/– |
| **(एन. डी. मेश्राम)** | **(एन. डी. मेश्राम)** |
| दिवाणी न्यायाधीश कोर्ट क्र.१, शेगांव | दिवाणी न्यायाधीश कोर्ट क्र.१, शेगांव |
| दि.०४.०५.२०२६ | दि.०४.०५.२०२६ |